असा. क्र. २३

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, मे ८, २००८/वैशाख १८, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.**—मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . . . . . | २४२-२४३ |

दिनांक ७ मे २००८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

---

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ८ मे २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१८८८ चा मुंबई ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००८ असे संक्षिप्त नाव म्हणावे.



[**किंमत** : रुपये १५.००]

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २६अ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २६अ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

" (१) प्रभाग निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नामनिर्देशनाकरिता नेमलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी प्रत्येक उमेदवार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाच हजार रुपये इतकी रक्कम रोखीने अनामत म्हणून ठेवील किंवा ठेवण्याची तजवीज करील आणि अशा प्रकारे अनामत रक्कम ठेवण्यात आली नसेल तर, कोणताही उमेदवार रीतसर नामनिर्देशित झालेला आहे असे मानण्यात येणार नाही :

परंतु, उमेदवार अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा, नागरिकांच्या मागासवर्गाचा किंवा महिला असेल तर, ही अनामत रक्कम दोन हजार पाचशे रुपये इतकी असेल :

परंतु आणखी असे की, उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रे भरली असतील तर, प्रत्येक नामनिर्देशनपत्राकरिता स्वतंत्र रक्कम अनामत म्हणून ठेवण्याची आवश्यकता असणार नाही. ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

असा. क्र. ४०

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे ८, २००८/वैशाख १८, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Mumbai Municipal Corporation (Second Amendment) Act, 2008 (Mah. Act No. XVIII of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XVIII OF 2008.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 8th May 2008).*

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act.

Bom. III of 1888. WHEREAS it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

**1.** This Act may called the Mumbai Municipal Corporation (Second Amendment) Act, 2008. Short title.

Amendment of section 26A of Bom. III of 1888.

**2.** In section 26A of the Mumbai Municipal Corporation Act, for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :— Bom. III of 1888.

"(*1*) On or before the date appointed for the nomination of candidates for a ward election, each candidate shall deposit or cause to be deposited with Returning Officer in cash a sum of five thousand rupees; and no candidate shall be deemed to be duly nominated unless such deposit has been made :

Provided that, where the candidate is a member of a Scheduled Castes, Scheduled Tribes, Backward Class of Citizens or a woman, the amount of deposit shall be two thousand and five hundred rupees :

Provided further that, where the candidate has filed more than one nomination paper, it shall not be necessary to deposit a separate amount for each nomination paper.".